**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान**
**कोटेशन नोटीस २०२४**

विषय : नाशिक महानगरपालिका, नाशिक DAY-NULM अंतर्गत शहरी बेघर विशेष निवारा (मानसिक विकलांग बेघर व्यक्ती) विनामुल्य तत्वावर देखभाल व व्यवस्थापन करणे कामी सामाजिक संस्था यांचेकडून कोटेशन मागविणे बाबत.

केंद्र शासन पुरस्कृत 'दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानांतर्गत "शहरी बेघरांना निवारा" (Shelter for Urban Homeless) हा एक महत्वाचा घटक राबविण्यात येत असून, निवारा हा मानवाची मुलभूत गरज असल्याने शहरातील बेघर व निराश्रित व्यक्तींना या घटकांतर्गत मुलभूत सुविधा असलेला कायमस्वरूपी/तात्पुरता निवारा उपलब्ध करून दिला जातो.

विशेष निवारे अंतर्गत मानसिक विकलांग निराधार व्यक्ती यांच्यासाठी निवारा केंद्र प्रस्तावित करण्यात येत असून मनपा मार्फत वीज, पाणी, स्वच्छता, सामाजिक सुरक्षितता व इमारत देखभाल व दुरुस्ती इत्यादी पुरविण्यात येणार आहे. सामाजिक सेवाभावी संस्था मार्फत विनामूल्य तत्वावर खालीलप्रमाणे अटीशर्तीनुसार कोटेशन मागविण्यात येत आहे.

१. सामाजिक संस्था/अशासकीय संस्था मा. धर्मादाय आयुक्तांकडे संस्था नोंदणी अधिअनियम अंतर्गत नोंदणीकृत असावी.
२. संस्थेचे मागील तीन वर्षाचे लेखापरीक्षण केलेले असावे.
३. संस्थेने मागील तीन वर्षात शासनाकडे कर भरलेली कागदपत्रे आवश्यक.
४. नाशिक जिल्ह्यामध्ये संस्थेचे कार्यालय असणे आवश्यक आहे.
५. शासनाने/न्यायालयाने संस्था काळ्या यादीमध्ये समाविष्ट केलेली नसावी. त्याबाबत प्रतिज्ञापत्र असावे.
६. संस्थेला बेघरांना निवारा, वसतीगृह, अनाथआश्रम, वृद्धाश्रम किंवा तत्सम केंद्र चालविण्याचा किमान तीन वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य असेल.
७. शासनाच्या/न्यायालयाच्या कायदेशीर प्रकरणात विवादित नसावी. त्याबाबत प्रतिज्ञापत्र असावे.

| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| 1 | मोफत अन्नपुरवठा (2 वेळ जेवण, एक वेळ नाश्ता, चहा) |
| 2 | अंथरूण व पांघरूण साहित्य |
| 3 | दैनंदिन वापराच्या वस्तू |
| 4 | पुर्ण वेळ व्यवस्थापक व काळजीवाहक |

निवारा केंद्राचे विनामूल्य तत्वावर देखभाल व व्यवस्थापन करणेकामी मनपाचे संकेतस्थळावर कोटेशन नोटीस प्रसिद्ध करून कोटेशन द्वारे सेवाभावी संस्था यांचेकडून अर्ज मागविण्यात आलेले आहेत. सदरील कोटेशन नोटीसीस अनुसरून आपले अर्ज दिनांक २६/११/२०२४ ते दिनांक ०२/१२/२०२४ रोजी दुपारी ४.०० वाजेपावेतो मा. उपायुक्त NULM, राजीव गांधी भवन, नाशिक मनपा मुख्यालय, नाशिक येथे बंद लिफाफ्यात सादर करावे.

**Sd/-**
**मा. उपायुक्त तथा शहर प्रकल्प अधिकारी**
**नाशिक महानगरपालिका नाशिक**